# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०२ मार्च, २०२३ / फाल्गुन ११, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **कृषि मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी पदोन्नतीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(१) * १७४६९ श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उपजिल्हाधिकारी संवर्गासाठी "सेवाप्रवेश, नियमितीकरण व सेवाज्येष्ठता" ठरविण्यासाठी सन १९७७ चे नियम लागू करण्यात आले असून सदर सेवाप्रवेश नियमामध्ये उपजिल्हाधिकारी संवर्गाची ज्येष्ठता यादी दरवर्षी प्रसिद्ध करुन अंतिम करणे बंधनकारक असतानाही सन २००४ ते सन २०२२ या कालावधीमधील उपजिल्हाधिकारी संवर्गाची ज्येष्ठता यादी महसूल विभागाने केलेल्या दुर्लक्षामुळे प्रसिद्ध करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) यांची १८१ पदे, अप्पर जिल्हाधिकारी यांची ३५ पदे व अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गाची ३७ पदे रिक्त असून शासनाने मा.न्यायालयात सदरहू पदे भरावयाची असल्याचे शपथपत्र तसेच उपजिल्हाधिकारी संवर्गाच्या ज्येष्ठता यादीतील ज्येष्ठता क्रमांकाबाबत महाराष्ट्र शासकीय न्यायाधिकरण व मा.उच्च न्यायालयात माहे मे, २०२२ मध्ये अनेक दावे दाखल केले असतानाही ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यास व रिक्त पदावर पदोन्नती देण्यास दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या अधिकाऱ्यांना सन २००२ मध्ये उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली त्या अधिकाऱ्यांनी सन २००२ पासून उपजिल्हाधिकारी या पदाचे अधिकार वापरून बजाविलेल्या कर्तव्याची नोंद घेऊन सन २००२ च्या ज्येष्ठता यादीत त्यांचा क्रम दाखविण्याऐवजी सन २००६-२००७ या कालावधीतील ज्येष्ठता यादीत क्रम दाखविण्यात येऊन ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.न्यायालयाचे कोणतेही स्थगिती आदेश नसताना व मा.न्यायालयात प्रकरणे प्रलंबित आहेत अशी कारणमीमांसा देऊन एकाच पदावर १८ ते २० वर्षांपासून कार्यरत असणारे ८५ उपजिल्हाधिकारी हे अपर जिल्हाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी तसेच २०० उपजिल्हाधिकारी हे निवडश्रेणी उपजिल्हाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तहसिलदार संवर्गातील उपजिल्हाधिकाऱ्यांना सह वर्गात पदोन्नती देताना रिक्त पदांच्या सरळसेवा व पदोन्नतीचे गुणोत्तर प्रमाण निश्चित करुन संवर्गाबाहेर स्वीयेत्तर सेवेत कार्यरत अधिकाऱ्यांची पदे विचारात घेऊन पदोन्नती आदेश काढण्यापुर्वी अधिसंख्य पदे निर्माण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करण्यास जाणीवपूर्वक विलंब करणाऱ्या महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, उपजिल्हाधिकारी संवर्गाची अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करणे, ज्येष्ठता यादीमधील वाद संपण्याच्यादृष्टीने पुर्वलक्षी प्रभावाने अधिसंख्य पदे निर्माण करून अधिकाऱ्यांना पदोन्नती दिनांक देणे व उपजिल्हाधिकारी यांना संवर्गनिहाय पदोन्नती देण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) महाराष्ट्र उप जिल्हाधिकारी (सेवाप्रवेश, ज्येष्ठता निश्चित करणे व स्थायीकरण) नियम, १९७७, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.११३६८/२०१९ व इतर प्रकरणी दिनांक १८/१२/२०१९ व मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई यांनी दिनांक ०६/१०/२०२० अन्वये दिलेल्या न्यायनिर्णयानुसार उप जिल्हाधिकारी संवर्गाची दिनांक ०१/०१/१९९९ ते दिनांक ३१/१२/२००३ या कालावधीची अंतिम सेवा ज्येष्ठतासूची शासन परिपत्रक दिनांक ३१/१२/२०२० अन्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच, शासन परिपत्रक दिनांक २९/०७/२०२२ अन्वये दिनांक ०१/०१/२००४ ते दिनांक ३१/१२/२००६ या कालावधीची तात्पुरती सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर सेवाज्येष्ठतेमध्ये उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना संवर्ग संख्येनुसार पदोन्नती कोट्यात जो कोटा उपलब्ध झाला आहे त्यानुसार पदांच्या उपलब्धतेनुसार सदर अधिकाऱ्यांना नियमित दिनांक देण्यात आलेला आहे. तसेच ज्या अधिकाऱ्यांना कोटा उपलब्ध झालेला नाही, अशा अधिकाऱ्यांच्या सेवा या ‘अभावित’ दर्शविण्यात आल्या आहेत.

शासन परिपत्रक दिनांक ३१/१२/२०२० अन्वये प्रसिद्ध अंतिम ज्येष्ठतासूचीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.४९०८/२०२१ व रिट याचिका क्र.२६१२/२०२१ मध्ये दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या न्यायनिर्णयान्वये जैसे-थे (Status-Quo) चे आदेश पारित केले होते. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने उक्त दोन्ही याचिका दिनांक १७/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये जैसे-थे (Status-Quo) आदेशासह मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे (T.A.०१/२१)(रिट याचिका क्र.४९०८/२०२१) व (T.A.०२/२१)(रिट याचिका क्र.२६१२/२०२१) वर्ग केल्या होत्या. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २६/०८/२०२२ रोजी अंतिम आदेश पारित केले आहेत. सदर अंतिम आदेशाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे शासनाने रिट याचिका क्र.११६९२/२०२२ व रिट याचिका

क्र.११७६२/२०२२ व्यतिरिक्त अपर जिल्हाधिकारी संवर्गातील (सरळसेवा व पदोन्नत) अधिकाऱ्यानी ५ याचिका अशा एकूण ७ याचिका दाखल करण्यात आल्या असून सदर याचिकांवर सुनावणी सुरु आहे.

शासन परिपत्रक दिनांक ३१/१२/२०२० अन्वये प्रसिद्ध अंतिम ज्येष्ठतासूचीबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.२३६/२०२१ व मूळ अर्ज क्र.२३७/२०२१ दाखल करण्यात आले होते. सदर अर्जावर झालेल्या मा.न्यायधिकरणाने दिनांक २७/०७/२०२१ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाद्वारे याचिकाकर्त्यांनी सेवाज्येष्ठतासूचीला स्थगिती देण्याची केलेली मागणी अमान्य केलेली आहे. सदर आदेशाविरुद्ध देखील मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका स्टॅम्प क्र. १५०६६/२०२१ दाखल केली आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल असलेल्या याचिकांमधील न्यायनिर्णयानुसार अपर जिल्हाधिकारी व उप जिल्हाधिकारी संवर्गाची सेवाज्येष्ठता यादी प्रसिद्ध करुन, अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी), अपर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी), उप जिल्हाधिकारी संवर्गात रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील ब्रह्मगिरी पर्वत व सह्याद्री पर्वतरांगांमधील डोंगरावरील अवैध उत्खनन रोखण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२) * १७०९८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र, तेलंगणा व आंध्र प्रदेश या तीन राज्यांची जीवनदायिनी असणाऱ्या गोदावरी नदीचे उगमस्थान असलेला ब्रह्मगिरी पर्वत व सह्याद्री पर्वतरांगामधील डोंगरांवर अवैध उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणच्या अवैध उत्खननाचा अहवाल सात दिवसांत सादर करण्याचा आदेश मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशान्वये अवैध उत्खननाचा अहवाल जिल्हाधिकारी, नाशिक यांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील ब्रह्मगिरी पर्वत व सह्याद्री पर्वतरांगांमधील डोंगरावरील अवैध उत्खनन रोखण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) ब्रम्हगिरी पर्वताचे पायथ्याशी मौजे. तळेगाव त्र्यं., ता.त्र्यंबकेश्वर येथील गट नं. १२३/ब/१/अ चे संबंधित जमीन मालक यांनी जमिनीतील खड्डे भरणे व जमीन सपाटीकरण यासाठी तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांच्याकडे अर्ज केला असता, तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी नैसर्गिक समतोल राखण्याच्या दृष्टीने परवानगी नाकारली असताना सदर गटाचे संबंधित जमीन मालक

यांनी माती, मुरूम, व दगड या गौणखनिजाचे उत्खनन व सपाटीकरणसाठी वापर केल्याचे दिसून आले. त्यानुषंगाने तहलिदार, त्र्यंबकेश्वर यांनी संबंधित जमीन मालक यांच्याविरूद्ध दिनांक १८/०६/२०२१ रोजी रुपये १,५२,४०,०००/- इतक्या रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले.

सदर आदेश संबंधित यांनी उपविभागीय अधिकारी, इगतपूरी-त्र्यंबकेश्वर यांच्याकडे आव्हानित केले असता त्यांनी दिनांक ०८/०६/२०२१ च्या आदेशान्वये फेटाळण्यात आले. सदर आदेशाविरूद्ध संबंधितांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.२९४०/२०२१ दाखल केली असता, मा.न्यायालयाने प्रस्तुत प्रकरण योग्य त्या न्यायालयाने दाखल करण्याचे निर्देश दिले असता, संबंधितांनी अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे अपिल दाखल केले. त्यानुषंगाने अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २८/०१/२०२२ रोजी तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी फेरचौकशी करून आदेश पारित करण्याचे आदेश दिले आहेत. संबंधितांनी अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या आदेशाविरूद्ध अपर विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे अपिल दाखल केले आहे.

जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अहवालानुसार ब्रम्हगिरी पर्वतावरील अवैध उत्खननाचा अहवाल ७ दिवसांत सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, नाशिक यांना प्राप्त झालेले नाही. अनाधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी भरारी पथके गठित केली आहेत. तसेच दिनांक २२/११/२०२२ च्या अधिसूचनेन्वये त्र्यंबकेश्वर संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यात आलेले असून सदर राखीव क्षेत्रात उत्खनन परवानगी देणे बंद करण्यात आले आहे.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाकडे वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यासाठीचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(३) * १७७९७ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुसंवर्धन विभागामार्फत नाविण्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गायी, म्हशींचे गट वाटप करणे, शेळी, मेंढी गट वाटप करणे, १ हजार कुक्कुट मांसल पक्ष्यांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीसाठी अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप करणे तसेच २५+३ तलंगा गट वाटपासाठी लाभार्थ्यांची निवड ऑनलाईन पद्धतीने करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: काटोल व रामटेक (जि.नागपूर) तालुक्यात आदिवासी क्षेत्रातील वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध असतानाही जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडे आलेले अनेक अर्ज मंजुरीअभावी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काटोल व रामटेक (जि.नागपूर) तालुक्यात जिल्हास्तरीय योजनेंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनेसाठी शेळी व गायी वाटपाचे पात्र लाभार्थ्यांचे अर्ज निकाली काढून निधी मंजूर करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) राज्यात सन २०१८-१९ पासून विविध राज्यस्तरीय योजनेंतर्गत तसेच, सन २०२१-२२ पासून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड ऑनलाईन पद्धतीने करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

तथापि, नागपूर, वर्धा, पुणे आणि सोलापुर या जिल्हयांमध्ये विधानपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची आचारसंहिता लागण्याच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पोर्टल सुरू होण्यापुर्वीच जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने पुर्ण झालेली असल्यामुळे त्या जिल्ह्यात सन २०२१-२२ मध्ये लाभार्थी निवड प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबविण्यात आलेली आहे.

सन २०२२-२३ मध्ये विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये लाभार्थ्यांची ऑनलाईन पद्धतीने निवड करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) नागपूर जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०२२ पासून गोवंशीय पशुधनामध्ये विषाणुजन्य लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव उद्भ्वल्यामुळे गुरांचे बाजार बंद होते. तसेच, विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी लम्पी चर्मरोग लसीकरण व नियंत्रणाच्या कामामध्ये गुंतलेले असल्यामुळे उक्त योजनेंतर्गत पशुगट खरेदी प्रक्रिया होऊ शकली नाही. आता गुरांचे बाजार पूर्ववत सुरू झाल्यामुळे गट खरेदी प्रक्रिया सुरू आहे.

-----------------

## मराठी चित्रपट अनुदान समिती पुनर्गठित करुन चित्रपटांना अनुदान अदा करण्याबाबत

**(४) * १६९४६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १६ मधील प्रश्न क्रमांक ११३८२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी चित्रपटांना प्रोत्साहन आणि अर्थसहाय्य मिळावे, यासाठी शासनामार्फत मराठी चित्रपट अनुदान समितीची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सरकारच्या काळात स्थापन झालेली मराठी चित्रपट अनुदान समिती बरखास्त करण्याचा निर्णय विद्यमान सरकारमार्फत घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी चित्रपट अनुदान समितीची पुनर्रचना झाली नसल्याने अनुदानासाठी अर्ज दाखल केलेले दोनशेहून अधिक चित्रपट परीक्षणाविना अनुदानाच्या प्रतिक्षेत असून समिती बरखास्त केल्याने अर्जही दाखल न केलेल्या शेकडो मराठी चित्रपटांचे अनुदान प्रलंबित असल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदान मिळण्यास वेळ लागत असल्याने मराठी चित्रपट निर्मात्यांना अडचणींना सामोरे जावे लागत असून पुढील दहा वर्षांचे सांस्कृतिक धोरण कार्यान्वित करण्यासाठी सन २०१० च्या धोरणात कालानुरूप बदल होत असतानाच प्रलंबित असलेल्या शेकडो चित्रपटांच्या अनुदानात वाढ करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मराठी चित्रपट अनुदान समिती पुर्नगठित करून अनुदानाच्या प्रतिक्षेत असलेल्या मराठी चित्रपटांना अनुदान अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २३/०९/२०२१, दिनांक २७/०१/२०२२ व दिनांक १२/०७/२०२२ अन्वये गठित केलेल्या समित्या विभागाच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये बरखास्त करण्यात आलेल्या आहेत.
(३), (४) व (५) होय, अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत महामंडळाकडे अंदाजे २१४ चित्रपटांचे परीक्षण (स्क्रीनिंग) करण्यासाठीचे प्रस्ताव प्रलंबित असून, शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २०२३ अन्वये गठित करण्यात आलेल्या परिक्षण समितीमार्फत चित्रपटांचे परीक्षण सुरु झालेले आहे. परीक्षणाअंती विहित प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पात्र चित्रपटांना अनुदान देण्यात येईल.

राज्य/ राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपटांकरीता, अनुदानात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आलापल्ली (जि.गडचिरोली) येथील वन विभाग क्षेत्रांतर्गत घोट परिसरातील मुरुम उत्खननात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) * १७५१० श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आलापल्ली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथील वन विभाग क्षेत्रांतर्गत घोट वनपरिसरातील जैवविविधतेतून अवैधरित्या मुरुम उत्खनन केल्याप्रकरणी कनिष्ठ कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन वरिष्ठ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर गैरव्यवहाराबाबत दोषी वन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) आलापल्ली वन विभागातील घोट वनपरिक्षेत्रातील जैवविविधता उद्यानातून मुरूम उत्खनन प्रकरणी प्राथमिक चौकशी करुन संबंधित १ वनपाल व २ वनरक्षक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, घोट यांना दिनांक २८/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

तसेच याप्रकरणी संबंधितांवर म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ८ व नियम १२ अंतर्गत दोषारोप बजावण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जमीन तुकडाबंदी कायद्यामध्ये सुधारणा करण्याबाबत

**(६) * १७५८९ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ चे कलम ४ (१) अन्वये किमान क्षेत्र घोषित करण्याबाबतची अधिसूचना दिनांक ५ मे, २०२२ रोजी प्रसिद्ध होऊन व आक्षेपाकरीताचा ३ महिन्यांचा कालावधी दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजी उलटून गेल्यानंतरही अधिसूचना अंतिम झाली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या अधिसूचनेद्वारे यापूर्वीच तुकडा पडलेल्या शेतजमिनी नियमानुकूल होणार असल्याची तरतूद करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अकृषिक परवानगी घेतलेल्या लेआउटपैकी असलेल्या प्लॉटच्याबाबत त्याची पोट विभागणीची खरेदी-विक्री ही नोंदविली जात नाही आणि नियमानुसार परवानगीसुद्धा देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व एकत्रीकरण (सुधारणा) अधिनियम २०१५ व त्यातील सुधारणेनुसार सदर अधिनियमामध्ये कलम ८ ब नव्याने समाविष्ट केले असून या संदर्भात महानिबंधकांनी जमिनीचे व्यवहार करण्यासंबंधीच्या आदेशानुसार लहान शेतकरी व मध्यमवर्गीय यांना अपरिमीत नुकसान होणार असल्याचे परिपत्रक दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निर्गमित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू अध्यादेश अंतिम करुन त्याबाबतचे शासन परिपत्रक नोंदणी महानिरीक्षक, उपमहानिरीक्षक, जिल्हा निबंधक व सर्व तालुकास्तरीय निबंधकांना निर्गमित करण्यात यावी जेणेकरुन लहान शेतकरी, जमीनधारक यांना खरेदी-विक्री चे व्यवहार करणे सोयीचे होईल अशी मागणी मिरज (जि.सांगली) तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या नेत्यांनी मा.मंत्री, महसूल यांच्याकडे दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवीन योजना राबविण्याची व अध्यादेश तातडीने निर्गमित करुन लहान शेतकरी जमीनधारक यांना खरेदी विक्री चे व्यवहार करणे सोयीचे होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

राज्यातील अकोला व रायगड जिल्हा वगळून उर्वरीत जिल्ह्यांकरीता जिरायत जमिनीकरीता २० गुंठे व बागायत जमिनीकरीता १० गुंठे इतके प्रमाणभूत क्षेत्र दिनांक ५ मे, २०२२ रोजीच्या प्रारूप अधिसूचनेन्वये घोषित करण्यात आले आहे. यासंदर्भात प्राप्त सूचना व आक्षेप विचारात घेवून त्याअनुषंगाने सदरची अधिसूचना अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी परिपत्रक निर्गमित केले आहे हे खरे आहे. त्यानुसार महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ कलम ८ ब मधील परंतुक मध्ये नमूद केल्याप्रमाणे मंजूर केलेला पोट-विभाग किंवा रेखांकन दस्तासोबत जोडला नसल्यास असे दस्त नोंदणीस स्विकारता येणार नाहीत अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) हे खरे आहे.

(६) व (७) राज्यातील अकोला व रायगड जिल्हा वगळून उर्वरीत जिल्ह्यांकरीता जिरायत जमिनीकरीता २० गुंठे व बागायत जमिनीकरीता १० गुंठे इतके प्रमाणभूत क्षेत्र दिनांक ५ मे, २०२२ रोजीच्या प्रारुप अधिसूचनेन्वये घोषित करण्यात आले आहे. यासंदर्भात प्राप्त सूचना व आक्षेप विचारात घेवून त्याअनुषंगाने सदरची अधिसूचना अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## गोळेगांव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील अवैध गौण खनिज उत्खननाबाबत

**(७) * १७१९३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोळेगांव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील गट क्रमांक ९४ मधील जमिनीमध्ये अवैध गौण खनिज उत्खनन केल्याबाबत उप अधीक्षक, भूमी अभिलेख, तहसिलदार, औंढा नागनाथ व उपजिल्हाधिकारी, वसमत यांनी दोषींना आठ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, वसमत यांनी माहे ऑक्टोबर, २०२० दरम्यान पोलीस निरीक्षक, औंढा नागनाथ यांना दोषींवर गुन्हा दाखल करण्याचे सूचित केल्यानंतरही पोलीस अधिकारी व तहसिलदार, औंढा नागनाथ यांनी याप्रकरणी कार्यवाही न केल्याने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात गैरव्यवहार केलेल्या दोषींचा जिल्हा सत्र न्यायालय, वसमत यांनी दिनांक १८ मे, २०२२ रोजी तसेच मा.उच्च न्यायालयाने माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जामीन फेटाळण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक पोलीस अधिकारी यांनी दोषींना अटक करण्यासाठी तसेच महसूल विभागाने शासनाच्या गौण खनिजाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करण्यासाठी कोणतीही कारवाई न केल्याने नांदेड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासन, जिल्हाधिकारी, हिंगोली व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध गौण खनिज उत्खननामुळे झालेले आर्थिक नुकसान वसूल करण्याबाबत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे गोळेगांव, ता.औंढा ना., जि.हिंगोली येथील गट नं ९० चे संबंधित खाणमालक यांनी त्याचा जमिनी लगत असलेल्या गट नं.९४ मधून गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आले असता, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, औंढा ना. यांनी केलेल्या मोजणीनुसार गट नं. ९४ मधून १७३३९.३० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निर्दशनास आले. त्यानुषंगाने तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी औंढा (ना.) यांनी महसूल जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ४८ (७) अन्वये दिनांक १४/१२/२०२१ च्या आदेशान्वये रुपये ०८,०६,२६,३५०/- इतक्या रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत. तसेच सदर दंडात्मक रकमेचा भरणा न केल्याने संबंधित खाणमालक यांच्या गा.न.नं.७/१२ गट नं. ९० वर बोजा चढविण्यात आला आहे.

गट नं. ९४ चे संबंधित मालक यांनी पोलीस स्टेशन, औढा ना. येथे दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित खाणमालक यांच्याविरूद्ध गु.र.क्र.००९५/२०२२ भा.द.वि.कलम ३७९, ४४७, ४२७, ३४ व महारष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) व (८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक ०६/०९/२०२२ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उप सचिव मा.उपमुख्यमंत्री यांचे कार्यालयाचे उप सचिव यांनी दिनांक १९/०९/२०२२ च्या पत्रान्वये लोकप्रतिनिधी यांना पत्रात नमूद कलेल्या मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या तदनंतर जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दिनांक २०/१०/२०२२ च्या पत्रान्वये लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनातील मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक, हिंगोली व तहसिलदार, औंढा ना. यांना दिलेल्या आहे.

-----------------

## राज्यातील ऊस तोडणी यंत्रधारकांना अनुदान देणेबाबत

**(८) * १७५३२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऊस तोडणीसाठी मजूरांची कमी उपलब्धता, ऊसतोड मजूरांकडून वाहनधारकांची होणारी आर्थिक फसवणूक यावर पर्याय म्हणून ऊस तोडणीचे यांत्रिकीकरण व्हावे, यासाठी केंद्र शासनाने यंत्रमालकांना प्रोत्साहित करण्यासाठी ऊस यंत्र अनुदान सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस तोडणी यंत्रासाठी केंद्र सरकार ६०% राज्य सरकार ४०% हिश्श्यानुसार राज्य सरकारच्या १२८ कोटी रुपये अनुदानाच्या हिश्श्यासह एकूण ३२० कोटी अनुदानाची रक्कम निश्चित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र सरकारने त्यांच्या हिश्श्याचा निधी मंजूर केला असला तरी राज्य शासनाने आपल्या हिश्श्याचा निधी जमा न केल्याने हे अनुदान तीन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१८-१९ पासून प्रलंबित असलेले अनुदान देण्यासाठी केंद्र सरकारने विशेष बाब म्हणून राज्यासाठी १९२ कोटी ७८ लाख रुपयांचे अनुदान राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून मंजूर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधीची तरतूद करुन ऊस तोडणी यंत्रधारकांना अनुदान तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी ऊस तोडणी यंत्रांना अनुदान प्रकल्पास केंद्र शासनाने दिनांक ०८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विशेष बाब म्हणून रुपये १९२.७८ कोटी निधीला मान्यता दिली आहे.

तसेच यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११/०१/२०२३ रोजी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत पूर्वी खरेदी केलेल्या कापणी यंत्रासाठी या योजनेंतर्गत पूर्वलक्षी अनुदान देता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.
(५) राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन-२०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीसाठी ऊस तोडणी यंत्रधारकांना अनुदान देण्याबाबत प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सोयाबीन पिकाचा अंतिम विमा परतावा मिळणेबाबत

**(९) * १७३६० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यामध्ये खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले असून शासनामार्फत तीन वेळा नुकसानग्रस्त भागाचे सर्वेक्षण करण्यात येऊन मदत जाहीर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सोयाबीनचा अंतिम विमा परतावा देण्यात येत असून येथील कास्तकारांना रुपये ६ ते ९ हजार हेक्टर इतक्या रकमेचाच परतावा मिळाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पीक विमा परताव्याकरीता पीक विमा कंपन्या शेतकऱ्यांकडून पीक विम्याचे हप्ते विहित मुदतीत वसूल करतात मात्र परतावा देताना नुकसानाच्या प्रमाणानुसार संरक्षित रकमेतून परतावा मिळणे अपेक्षित असताना विमा कंपनीकडून सर्व नियम, निकषांचे पालन न करता संरक्षित रकमेच्या अत्यल्प प्रमाणात शेतकऱ्यांना परतावा देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सोयाबीन पिकाला हेक्टरी सुमारे ४४ हजार संरक्षित रक्कम असून संरक्षित रकमेच्या ५ टक्केही परतावा देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमा कंपनीकडून सर्व नियम, निकषांचे पालन करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विहित कालावधीत संरक्षित रकमेच्या प्रमाणात पीक विमा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात नुकसान व पीक पेरणी पासून काढणी कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट या जोखमींच्या बाबींचा समावेश होतो.

त्यामुळे, सदरचा परतावा हा अंतिम नसून, माहे डिसेंबर, २०२२ अखेर केवळ स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गतची नुकसान भरपाई मिळाली असून उर्वरीत काढणी पश्चात नुकसान भरपाई वाटप व उत्पादनावर आधारीत नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) योजनेंतर्गत अकोला जिल्ह्यात खरीप हंगाम २०२२ मध्ये सोयाबीन पिकाकरीता स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत ४४१३६ शेतकरी अर्जदारांना रुपये ३६.०६ कोटी निश्चित करण्यात आली असून त्यापैकी दिनांक १५/०२/२०२३ अखेर, ४१४७७ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ३५.५२ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत रुपये ०.५५ कोटी नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत ४२०७ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १०.३४ कोटी निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे उत्पादनावर आधारीत नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ईसारवाडी (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे "मोसंबी इस्टेट" प्रकल्प सुरु करणेबाबत

**(१०) * १७१११ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या ३ जिल्ह्यात ४१००० हेक्टर मोसंबीच्या बागाची लागवड केली जात असून सदरहू जिल्हे मोसंबीचा गड म्हणून प्रसिद्ध आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोसंबी लागवडीसाठी खाजगी नर्सरी धारकांकडून जातीवंत, कीड व रोगमुक्त दर्जेदार कलमे मिळत नसल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याने मोसंबीची जातीवंत मातृवृक्षाची लागवड करणे, कीड आणि रोगमुक्त दर्जेदार कलमे तयार करणे, शास्त्रोक्त पद्धतीने मोसंबीच्या फळबागा विकसित करणे, मोसंबी प्रक्रिया, ग्रेडिंग, स्टोअरेज, संकलन केंद्र व्हावे, यासाठी ईसारवाडी (ता.पैठण) येथे वर्षभरापुर्वी "मोसंबी इस्टेट" प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाला मान्यता मिळून १ वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही प्रकल्प उभारणीबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ईसारवाडी (ता.पैठण) येथे "मोसंबी इस्टेट" प्रकल्प उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

मोसंबी सिट्रस इस्टेट कार्यकारी समितीने शासकीय फळरोपवाटिका, पैठण येथील प्रक्षेत्र सलग नसल्याने तसेच मोसंबी सिट्रस इस्टेटसाठी प्रस्तावित जागेतील काही क्षेत्र मोसंबी पिकाच्या वाढीसाठी पोषक नसल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक १८/०७/२०२२ च्या कार्यकारी समितीच्या बैठकीत तालुका फळरोपवाटिका, पैठण येथील स्थळ बदलाचा ठराव संमत करुन तालुका बीज गुणन केंद्र, ईसारवाडी, (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर या प्रक्षेत्रावर स्थापित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) वन परिक्षेत्रातील वन मजुरांच्या सेवा अखंडीत करुन प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत

**(११) * १७८३१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर, कासा, डहाणू, सफाळे, उधवा, सायवन, पालघर, दहिसर व भाताणे रेंज (ता.डहाणू, जि.पालघर) येथील वन परिक्षेत्रातील वन मजूरांबाबत मा.न्यायालयाने "नॉट टु बी टर्मिनेट स्टेटस टू बी मेन्टेन" असे आदेश उप वनसंरक्षक यांना दिलेले असतानाही वन मजुरांच्या सेवेत वारंवार खंड देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वन मजुरांचे गत पाच ते सहा महिन्यांचे वेतनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वन मजुरांच्या संघटनेने वेळोवेळी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, वने, उप वनसंरक्षक, डहाणू विभाग यांच्याकडे निवेदन सादर केलेले असतानाही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त वनपरिक्षेत्रातील वन मजुरांची अखंडीत सेवा सुरु करुन त्यांचे प्रलंबित वेतन अदा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

वनमजुरांचे मजुरीबाबत मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे तक्रार युएलपी क्र.१०१/२०२१ दाखल करण्यात आली होती. सदर प्रकरणी, मा.न्यायालयाने दिनांक २३/०८/२०२१ रोजी अंतरिम आदेश दिले होते. सदर आदेशामध्ये Priority in providing work to the employees and Termination of services stands rejected असा आदेश देण्यात आला आहे. तसेच दुसऱ्या तक्रार युएलपी क्र.२२४/२०२१ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक १८/०१/२०२२ रोजी दिलेल्या आदेशामध्ये Temporarily restrained from terminating services of employees mentioned in Annexure A till next date without following due process of law असा अंतरिम आदेश पारित केलेला आहे.

(२), (३) व (४) मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधित वनमजुरांना काम उपलब्ध करुन देण्याबाबत वनमजुर संघटनेकडून मा.मंत्री (वने) यांना दिनांक ११/१०/२०२२ रोजी निवेदन देण्यात आले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित वनमजूरांना कामाच्या उपलब्धतेनुसार प्राधान्याने काम उपलब्ध करुन देण्याबाबत उपवनसंरक्षक, डहाणू यांनी संबंधित वनक्षेत्रपालांना सूचना दिल्या आहेत. तसेच याबाबत वनमजुर संघटनेला दिनांक २४/०१/२०२३ रोजी अवगत केले आहे.

त्याचप्रमाणे विविध योजनेंतर्गत अनुदान उपलब्धतेनुसार संबंधित १२३ वनमजुरांपैकी ११० मजुरांना त्यांची पूर्ण मजूरी अदा करण्यात आली असून उर्वरित १३ मजुरांची थकीत मजूरी अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील रस्त्यांवर आरेची अनधिकृत केंद्रे उभारल्याबाबत

**(१२) * १७६१० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील पदपथांवर सन १९६० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळापासून दुध वितरणासाठी असलेल्या आरेच्या १८०० केंद्रांना दरमहा १५० रुपये दराने शासनामार्फत परवानगी देण्यात आली होती परंतु आता मुंबईत आरेची ४००० दुकाने केंद्रे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत आरेचे कोणतेही उत्पादन बाजारामध्ये उपलब्ध नसून दुध व अन्य कोणतेही उत्पादन या केंद्रांवर मिळण्याऐवजी गुटखा, वेफर्स, अल्पोपहाराचे पदार्थ व इतर वस्तू मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नमूद अनधिकृत केंद्रे महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने उभारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनामार्फत देण्यात आलेल्या सर्व आरे केंद्रांचे सर्वेक्षण करुन ही दुकाने कोणामार्फत चालविण्यात येतात हे पाहणे, त्या दुकानांत कोणते पदार्थ विकले जातात याची यादी तयार करणे, दरमहा १५० रुपये दरात वाढ करणे, ही दुकाने परप्रांतीयांकडून चालविण्यात येत असून त्यांना दूर करून राज्यातील नागरिकांना दुकाने चालविण्यास देणे इ. बाबींबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आरेच्या केंद्रांची तपासणी करणे, अनधिकृत केंद्रांवर कारवाई करणे व अधिकृत केंद्रांवर नागरिकांना योग्य ते उत्पादन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) मुंबई शहर व उपनगरात दुग्धविकास विभागाची एकूण १८११ आरे केंद्र असून, त्यापैकी १६९५ केंद्र कार्यरत आहेत.
(२) सदर आरे केंद्रांना आरे ब्रँडशिवाय इतर संस्थांचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विकण्यास परवानगी देण्यात आली आहे.
(३), (४), (५) व (६) आरे स्टॉल तपासणीसाठी पथके तयार करण्यात आली असून तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## विक्रमगड, डहाणू, जव्हार, मोखाडा, तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी कुटुंबांचे रोजगारासाठी शहरी भागात स्थलांतर होत असल्याबाबत

**(१३) * १७०८१ श्री.प्रसाद लाड, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड, डहाणू, जव्हार, मोखाडा, तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील आदिवासी कुटुंबांना रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजगारासाठी हजारो आदिवासी आपल्या कुटुंबासह शहरातील पालघर, भिवंडी, ठाणे, वसई-विरार, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली तसेच थेट गुजरात अशा मोठ्या शहरात बांधकाम व्यावसायिक, मजूर, नाका कामगार, किरकोळ काम करणारे मजुर, बिगारी, गवंडी, गवत कापणी, वीटभट्टी यासारख्या मोलमजूरीच्या कामासाठी शहरी भागात स्थलांतरित होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाकडून रोजगार हमी योजना व इतर योजनेतून कामगारांना कामे उपलब्ध होत नसल्याने रोजगार हमी योजनेची कामे तात्काळ सुरू करण्यबाबतच्या मागणीचे निवेदन तेथील काही ग्रामस्थांनी मा.मंत्री, रोजगार हमी योजना, मा.अपर मुख्य सचिव, रोजगार हमी योजना, मा.आयुक्त, रोजगार हमी योजना, जि.नागपूर, मा.जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यातील आदिवासी ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेची कामे सुरू करण्याबाबत तसेच अदिवासी कुटुंबांचे स्थलांतरण इतर शहरात रोखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
विविध कारणास्तव नजीकच्या शहरात आदिवासी कुटुंबाचे स्थलांतरण झालेले आहे.
(३) दिनांक १ जानेवारी, २०२३ चे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) पालघर जिल्ह्यात सन २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षात ७३१७८ आदिवासी कुटुंबांना ३८५९००० मनुष्यदिवस काम देण्यात आले आहे. पालघर जिल्ह्याला शासनाने एकूण मनुष्यदिवस निर्मिती उद्दिष्ट ४४.०४ लक्ष दिले होते. त्यापैकी ४१.३० लक्ष (९३.७९%) इतके लक्षांक जानेवारी, २०२३ अखेर साध्य

केले आहे. तसेच, पालघर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दिनांक १ एप्रिल, २०२२ पासून ११०.०३ कोटी इतका निधी मजूरांच्या मजुरीवर खर्च करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यामधील शेतकऱ्यांना प्रलंबित ठिबक अनुदान अदा करण्याबाबत

**(१४) * १७३३१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (प्रति थेंब अधिक पीक) घटक अंतर्गत तुषार व ठिबक सिंचन संच बसविणे करीता अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सन २०२१-२०२२ मध्ये ३५ शेतकऱ्यांचे सुमारे २५ लाख, सन २०२२-२०२३ मध्ये सुमारे १००० शेतकऱ्यांचे सुमारे दीड कोटी रुपये ठिबक संच अनुदान प्रलंबित असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२३ मध्ये रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पात्र शेतकऱ्यांना ठिबक संच अनुदान अदा करण्याबाबत विभागाकडून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय. सन २०२१-२२ मधील अनुदानास पात्र असलेल्या सर्व २२०० शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रुपये ६.७९ कोटी अनुदान वाटप केले आहे. सन २०२२-२३ मधील १९३० शेतकऱ्यांपैकी ६१४ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रुपये १.८३ कोटी अनुदान वाटप केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वाघांच्या संवर्धनासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१५) * १७२४५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सचिन अहिर : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक १०७७७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात मागील दहा वर्षांतील सर्वाधिक व्याघ्रमृत्यू सन २०२१ मध्ये झाले असून सन २०२२ मध्ये देशभरात ११५ वाघ गमावले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशभरात सन २०१८ च्या व्याघ्रगणनेनुसार राज्यात २७ वाघांचा मृत्यू झाला असल्याची व अमिशी बीट (ता.जि.गडचिरोली) येथील पाच महिन्यांच्या वाघाच्या बछड्यांच्या दोन मृतदेहांचे अवशेष आढळले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मानवी विकासामुळे वाघांच्या वास्तव्याचे विभाजन होऊन मानवाचे वास्तव्य वाढत असल्याने मानव आणि वन्य जीवातील संघर्ष वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्रात वाघांच्या/बछड्यांच्या मृत्यूंची सर्वसाधारण कारणे शोधून घटत चाललेल्या वाघांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी व राज्यातील वाघांच्या संवर्धनासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरील माहिती नुसार मागील दहा वर्षात देशात सन २०२१ मध्ये सर्वाधिक १२७ वाघांचा मृत्यू झाल्याचे नमूद आहे. तसेच सन २०२२ मध्ये देशभरात १२१ वाघांचा मृत्यू झाला असून त्यापैकी महाराष्ट्र राज्यात २९ वाघांचा वेगवेगळया कारणांमुळे मृत्यू झाला आहे.
(२) देशभरात सन २०१८ मध्ये एकूण १०१ वाघांचा मृत्यू झाला असून त्यापैकी महाराष्ट्र राज्यात १९ वाघांचा मृत्यू झाला आहे.

गडचिरोली वनविभागाअंतर्गत चातगाव परिक्षेत्रातील अमीर्झा नियतक्षेत्रात दिनांक ०३/०१/२०२३ रोजी १ व दिनांक ०६/०१/२०२३ रोजी १ असे एकूण २ वाघाचे बछडे (वय अंदाजे ३ महिने) मृत अवस्थेत आढळून आले आहेत. परिस्थीतीजन्य पुरावे व शवविच्छेदन अहवालानुसार सदर बछड्यांचा मृत्यू दुसऱ्या वाघाच्या हल्ल्यात झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, उक्त दोन्ही बछड्यांचा अवयावांचे नमुने पुढील तपासणीसाठी Centre for Cellular and Molecular Biology (CCMB) Hyderabad या संस्थेकडे पाठविण्यात आले आहेत.
(३) उत्तम वन्यजीव संरक्षणाचा परिणाम म्हणून सर्वच वन्यजीवांच्या संख्येत वाढ झालेली असून मानवांद्वारे जमीन वापर पद्धतीत बदल, वन्यजीवांच्या अधिवासात खंड निर्माण होणे, वाघ, बिबट सारख्या वन्यप्राण्यांची संख्या वाढल्याने नवीन अधिवास क्षेत्राचा शोध, ग्रामस्थ अकाष्ट वनोपज गोळा करण्यासाठी, गुरेचराईसाठी वनात व वनालगत जाणे इत्यादी कारणांमुळे मानव-वन्यप्राणी संघर्ष वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.
(४) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) व भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून (WII) च्या वतीने All India Tiger Estimation-२०१८ चौथी अखिल भारतीय व्याघ्र प्रगणना २०१८ मध्ये पुर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील वाघांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | २००६ | २०१० | २०१४ | २०१८ |
|---|---|---|---|---|
| वाघांची संख्या | १०३ | १६९ | १९० | ३१२ |

उपरोक्त परिस्थितीनुसार महाराष्ट्र राज्यात वाघांची संख्या १०३ वरुन ३१२ झाली आहे.

राज्यात वाघ व इतर वन्यप्राण्यांच्या संवर्धनाच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

- वाघ व वन्यप्राण्यांना मानवी हस्तक्षेप विरहीतक्षेत्र (पोषक अधिवास) निर्माण होण्याकरीता राज्यातील अभयारण्य / राष्ट्रीय उद्यान / व्याघ्र प्रकल्पातील कोर क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन संरक्षित क्षेत्राबाहेर करणे.
- राज्यातील व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातुन / संरक्षित क्षेत्रातुन जाणाऱ्या महामार्गावर Overpass, Underpass, Box Culvert इत्यादी उपशमन योजना करण्यात येतात.
- वन्यप्राण्यांचा मागोवा घेणे, कॅमेरा ट्रॅप लावणे.
- STPF पथकाद्वारे गस्त करणे, पावसाळ्यात विशेष गस्त करणे.
- गुप्त सेवा निधी उपलब्ध करुन देणे
- M-Stripes प्रणालीद्वारे वन्यप्राण्यांच्या गतिविधीवर लक्ष ठेवणे.
- विद्युत ट्रिपिंग वर लक्ष ठेवणे.
- पाणस्थळाची तपासणी करणे.
- संरक्षण कुटीतील वनमजुरांद्वारे वन्यप्राण्यांवर लक्ष ठेवणे.
- मुसाफिर रजिस्टर ठेवणे, मुसाफिर लोकांचे डेरे तपासणे.
- वनातील / वनाशेजारी गावात जनजागृती करणे.

राज्यात विशेषत: चंद्रपुर जिल्ह्यातील वाघ-मानव संघर्षाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी व उपाययोजनांसह आराखडा सादर करण्यासाठी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपुर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०७/१०/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये तांत्रीक अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली होती. सदर अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालास राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता प्रदान करण्यात आली असून त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत

**(१६) * १७६४७ श्री.एकनाथराव खडसे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची ५० टक्केपेक्षा अधिक पदे रिक्त असल्याने पशुधनावर उपचार करण्यास पशुपालकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळवद (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील गावांमध्ये तसेच काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील १७ गावांमध्ये शेळी, बैल, गाय, म्हैस, कुत्रा आदी पाळीव जनावरांना होत असलेल्या विविध आजारांवर उपचार करण्याकरीता लघु पशुवैद्यकीय दवाखाने असून पशु पर्यवेक्षक उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांच्या वैद्यकीय उपचाराची गैरसोय होणे, जनावरांवर संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणे, इत्यादीमुळे १७ गावांमध्ये नियमित पशुवैद्यकीय डॉक्टरांची व पशु पर्यवेक्षकांची नेमणुक तथा पशुवैद्यकीय दवाखान्याचे उपकेंद्र मध्यभागी स्थापन करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत तसेच नागपूर येथे पशुवैद्यकीय दवाखान्यांचे उपकेंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) सद्य:स्थितीत राज्यातील पशुवैद्यकीय अधिकारी (गट-अ) या संवर्गातील एकूण मंजूर पदे २१९५ असून त्यापैकी १८६४ पदे भरलेली आहेत व ३३१ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरीक्त कार्यभार नजिकच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला असून पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(२) व (३) सावनेर तालुक्यात तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय सावनेर व ११ पशुवैद्यकीय संस्था अशा एकूण १२ संस्था असून सदर संस्थांमध्ये पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी -२ केळवदसह सर्व संस्थांमध्ये पशुधन पर्यवेक्षक कार्यरत आहेत.

तसेच काटोल तालुक्यामध्ये तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय काटोल व १७ पशुवैद्यकीय संस्था अशा एकूण १८ संस्था असून सदर संस्थापैकी १२ पशुवैद्यकीय संस्थामध्ये पशुधन पर्यवेक्षक कार्यरत आहेत. उर्वरित ६ पशुवैद्यकीय संस्थामधील पशुधन पर्यवेक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन पर्यवेक्षकाकडे सोपविण्यात आलेला आहे. याव्दारे सर्व पशुवैद्यकीय संस्थांमध्ये जनावरांवर नियमित औषधोपचार सुरु आहेत.

तसेच मागणीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत

**(१७) * १७०५५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत नियमित कर्जफेड करणारे १४ लाख ३९ हजार शेतकरी पात्र ठरले असून शासनाने दोन टप्प्यात अनुदान वाटप केलेले असले तरी अद्याप ७ लाख १९ हजार शेतकरी अनुदान मिळण्यापासून वंचित राहिले असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पहिल्या टप्प्यात नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या एकूण ७.२० लाख शेतकऱ्यांना २६३७.२२ कोटी इतक्या रकमेचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला असून दुसऱ्या टप्प्यामध्ये उर्वरीत पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी बँकांमार्फत ८.९१ लाख कर्जखात्यांचे संगणकीय संस्करण करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा बँकांनी शासनाच्या पोर्टलवर पात्र शेतकऱ्यांच्या भरण्यात आलेल्या माहितीपैकी ७ लाख ७७ हजार कर्ज खातेदारांची माहिती चुकीची असून कर्ज खातेदारांची माहिती संगणकीय प्रणालीवर भरण्यापूर्वी विभागीय लेखापरीक्षकांमार्फत माहितीची पडताळणी करण्यात येऊन बँकेने अचूक माहिती न भरल्याने शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ मिळण्यास विलंब होत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात या योजनेंतर्गत एकूण २१ हजार ५६८ कर्ज खातेदारांपैकी ४ हजार ६३१ कर्ज खातेदारांची अचूक माहिती नोंदविण्यात आली आहे, तसेच सोलापूर जिल्ह्यात उक्त योजनेंतर्गत माहिती भरण्यात आलेल्या ४५ हजार ६१४ पात्र शेतकऱ्यांपैकी २६ हजार ५१३ शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान मिळाले असून १९ हजार १०१ शेतकरी प्रोत्साहन अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संगणकीय प्रणालीमधील चुकीची माहिती अद्ययावत करणे, चुकीची नोंद घेणाऱ्या लेखा परिक्षक व बँकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे व शासनाने जाहीर केल्याप्रमाणे या आर्थिक वर्षात प्रोत्साहन अनुदानाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या ७ लाख १९ हजार पात्र शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४), (५) व (६) महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेंतर्गत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या कर्जखात्यांना रुपये ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. सदर योजनेंतर्गत कर्जखात्यांची माहिती योजनेच्या संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्यापूर्वी सहकार विभागाच्या लेखापरिक्षकांमार्फत कर्जाचा प्रकार, कर्ज उचल व कर्ज परतफेड रक्कम, कर्ज उचल व परतफेड दिनांक इ. बाबींची पडताळणी करण्यात आली. तथापी, योजना निकषानुसार पात्र ठरलेल्या खातेदारांना लाभ देण्याच्या प्रक्रियेदरम्यान निदर्शनास आले की, खातेदाराचे आधार कार्डवरील नाव, संस्थेच्या कर्जखात्यावरील नाव, बँकेकडील डेटा मास्टरमधील नाव यामध्ये फरक आहे. यामुळे खातेदारांना लाभ देण्याची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. यास्तव अशा प्रकारची खाती सुधारणा करण्यासाठी बँकांना पाठविण्यात आली आहेत. तथापि, अचूक माहिती नोंदविण्यात आलेल्या व सदर योजनेच्या निकषानुसार पात्र ठरलेल्या कर्जखात्यांपैकी १४.४४ लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणिकरण पूर्ण झाले आहे. त्यापैकी १२.८३ लाख कर्जखात्यांना रुपये ४६८३.१६ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. यापैकी रत्नागिरी जिल्ह्यातील ६७०१ कर्जखात्यांना रुपये १५.९५ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील ३१,५१९ कर्जखात्यांना रुपये १४१.०७ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. तथापि, अचूक माहिती नोंदविण्यात आलेल्या व सदर योजनेच्या निकषानुसार पात्र ठरलेल्या उर्वरीत कर्जखात्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेच्या नियम व अटी शिथिल करण्याबाबत

**(१८) * १७६९४ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना" राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत सन २०१७ – २०१८, २०१८ – २०१९ व २०१९ – २०२० या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांमध्ये पीक कर्जाची उचल करुन शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीत परतफेड केलेली आहे, अशा शेतकऱ्यांना शासनामार्फत रुपये ५० हजार पर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत प्रोत्साहनपर लाभ देण्याच्या नियम व अटी जाचक असल्याने त्याचा लाभ शेतकऱ्यांना पूर्णपणे मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेच्या नियम व अटी शिथील करुन योजनेतील लाभार्थ्यांना रुपये ५० हजार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत नागपूर जिल्हा परिषदेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) * १६९७३ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत घेण्यात आलेल्या ११६१४ सिंचन विहिरींच्या धडक कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२०२० मधील पहिल्या टप्प्यात १०००० विहिरी व सन २०२०-२०२१ मधील दुसऱ्या टप्प्यात ३००० विहीरी अशा प्रकारे १३००० धडक सिंचन विहीर कार्यान्वित करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन निर्णयान्वये नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत धडक सिंचन विहिर कार्यक्रम योजनेंतर्गत १३००० सिंचन विहिर कार्यान्वित करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यानुसार आवश्यक निधीची तरतूद मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करुन रुपये २८२.६९ कोटी निधीची मागणी जिल्हा परिषद, नागपूर यांनी शासनाला केली असतानाही अद्याप निधी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाला मान्यता प्रदान करून आवश्यक निधीची तरतुद जिल्हा परिषद, नागपूर यांना उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सिंचन विहिरींच्या धडक कार्यक्रमांतर्गत अतिरिक्त १३००० सिंचन विहिरींचा लक्षांक व योजनेत वर्धा जिल्ह्याचे समावेशन करण्यात आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे,

फक्त नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत ही योजना कार्यान्वित नसून, विभागाच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी वितरणासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांना नोडल अधिकारी घोषित करण्यात आलेले आहे.
(३) विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या दिनांक २७ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये रुपये २८२.६९ कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने सदर योजनेंतर्गत आत्तापर्यंत निधीच्या उपलब्धतेनुसार रक्कम रुपये ९३.०० कोटी इतका निधी विभागीय आयुक्त, नागपूर यांना वितरीत करण्यात आलेला आहे.
(४) सदर कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, नागपूर यांना मागणी प्रमाणे रुपये ४.४० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. निधीच्या उपलब्धतेप्रमाणे अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यामध्ये अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२०) * १७६३९ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या वाळू तस्करांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या पथकांवर वाळू तस्करांकडून हल्ले करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळू तस्करांकडून सरकारी नियम न जुमानता अवैधरित्या वाळू उपसा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अवैध वाळू उपसा करणाऱ्या व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी तहसिल कार्यालय, वरूड, दर्यापूर व धामणगाव रेल्वे येथील स्थापन करण्यात आलेली भरारी पथके तपासणी करीता गेली असता, या पथकांवर हल्ले करण्यात आले. त्यानुषंगाने संबंधितांविरूद्ध अनुक्रमे पोलीस स्टेशन, शेंदुरजनाघाट येथे गु.र.क्र.०४१६/२०२२ भादवि-३५३, ३९२, ५०४ व ३४ पोलीस स्टेशन, येवदा येथे गु.र.क्र.००२/२०२३ भादवि ३५३, ३५९, ५०४, ५०६ व ३४ अन्वये आणि पोलीस स्टेशन, मंगरूळ दस्तगीर येथे गु.र.क्र.००५१/२०२३ भा.द.वि ३७९, ३५३, ३४१ व ३४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अमरावती जिल्ह्यात दिनांक ०१ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३१ जानेवारी, २०२३ या कालावधीत अवैध उत्खनन व वाहतुकीच्या एकूण ३११ प्रकरणामध्ये दंडात्मक कार्यवाही करून एकूण ०१.११ कोटी इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच अमरावती जिल्ह्यामध्ये सन २०२२-२३ मध्ये एकूण १५ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण ठेवणेकरीता भरारी पथके व चेकपोस्ट स्थापन करण्यात आल्या आहेत.

-----------------

## मौजे दापिवली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील हिंदुस्तान ऑरगॅनिक केमिकल लि. प्रकल्पाने संपादीत न केलेली जमीन शेतकऱ्यांच्या नावे करण्याबाबत

**(२१)** * **१६९२९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दापिवली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सोळाशे एकर जमीन महाराष्ट्र शासनामार्फत प्रकल्प भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार संपादित करून सन १९६२ ते १९६८ या कालावधीमध्ये हिंदुस्तान ऑरगॅनिक केमिकल लि.यांच्या नावे करण्यात आली आहे व तद्नंतर सन १९७४ साली सोळाशे एकर जमिनीपैकी १ हजार ६१ एकर जमीन हिंदुस्तान ऑरगॅनिक केमिकल लि.प्रकल्पाने आपल्या नावावर ठेवून ५३९ एकर जमीन केंद्र व राज्य शासनाच्या इतर प्रकल्पांना वर्ग करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंदुस्तान ऑरगॅनिक केमिकल लि.या प्रकल्पामार्फत १ हजार ६१ एकर जमिनीपैकी ५१० एकर जमीन प्रकल्पाकरीता व कामगार वसाहतीकरीता वापरात असून, उर्वरित ५०० एकर जमिनीचा उद्दीष्टांसाठी ताबा न घेतल्याने सदर जमीन संपादनापूर्वीपासून शेतकऱ्यांच्याच ताबे कब्जात व वहिवाटीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जमिनींवर शेतकऱ्यांनी घरे बांधलेली असून तेथे विविध पिकांचे उत्पादन, इतर उद्योग व्यवसायांची उभारणी करणे इ.कामे करण्यात येत असून शेतकरी यावर उदरनिर्वाह करीत असल्यामुळे सदर जमिनीचा ताबा मूळ शेतकऱ्यांना देऊन जमिनीच्या ७/१२ वर लागलेल्या नोंदी कमी करण्यासाठी विविध बैठका, आंदोलनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांकडून पाठपुरावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ७ गावांचे पुनर्वसन करणे, गावठाण विस्ताराची वाढ करणे तसेच शेतकऱ्यांनी बांधलेली घरे कायम करुन सदरहू शेतकऱ्यांना उक्त जमिनीवर ताबा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मौजे दापिवली, ता.पनवेल येथील १३१.१६ एकर जमीन औदयोगिक कारणास्तव दिनांक २०/०३/१९६३ रोजी संपादित करण्यात आली आहे. संपादनानंतर फेरफार क्र.२५० दिनांक २८/०८/२०१८ अन्वये मौजे दापिवली ता.पनवेल येथील क्षेत्र ०२-०१-५० हे.आर. एवढी जमीन बी.पी.सी.एल. कंपनीस विक्री करण्यात आली. सद्य:स्थितीत सदर गावात एच.ओ.सी.एल. कंपनीच्या नावे ५०-२८-५० हे.आर. एवढे क्षेत्र दाखल आहे.

एच.ओ.सी.एल. कंपनीकरीता रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील ५ गावे व खालापूर तालुक्यातील ३ गावात मिळुन एकूण १५५८.२४ एकर जमीन संपादित करण्यात आली. संपादनानंतर संपादित जमिनीचा ताबा कंपनीला देण्यात आला. ताब्यानंतर जमीन एम.आय.डी.सी., एच.आय.एल., एम.एस.ई. बी. व महाराष्ट्र शासन यांना एकूण ५३५.६२ एकर हस्तांतरीत केली आहे. कंपनीच्या ताब्यात असलेल्या उर्वरीत जागेपैकी शेती, रहिवास व अतिक्रमणधारकांच्या सार्वजनिक वापराबाबत असे मिळुन ३५५.०४ एकर एवढया क्षेत्रावर अतिक्रमण आहे.

सार्वजनिक प्रयोजनाबाबत भूसंपादित परंतु विनावापर जमिनीच्या विल्हेवाटीबाबत सर्वोच्च न्यायालयाने भास्करन पिल्ले प्रकरणी दिनांक ०५/०५/१९९७ रोजीच्या निर्णयानुसार राज्य शासनाने शासन निर्णय क्र. एलक्यएन ३०/२०००/प्र.क्र.६७/अ-२, दिनांक १२/०३/२००४ अन्वये धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार अशा जमीनी मूळ धारकाला परत करता येत नाहीत. परंतु सदर जमिनीचा मूळ संपादक विभाग तसेच केंद्र/राज्य शासन यांना सार्वजनिक प्रयोजनार्थ आवश्यकता नसल्यास त्यांची जाहीर लिलावाद्वारे विल्हेवाट लावता येईल व अशा लिलावामध्ये मूळ धारकाला भाग घेता येईल.

तसेच कंपन्याकरीता संपादित जमिनी अतिक्रमण विरहीत ताब्यात ठेवणे ही सर्वस्वी कंपनीची जबाबदारी आहे. अशा अतिक्रमणाबाबत राज्य शासनाचे विवक्षीत असे कोणतेही धोरण नाही.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी बाधित व्यक्तींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीनी सहमती दर्शविलेले सानुग्रह अनुदान व इतर लाभ, न्याय पद्धतीने देण्याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेनुसार मदत व पनुर्वसन उपविभागाच्या दिनांक २२/१२/२०२१ रोजीच्या अ.शा. पत्रान्वये केमिकल व पेट्रोकेमिकल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अवगत करण्यात आले आहे.

मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०८/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत "उक्त पत्राच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करणेसंदर्भात केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात यावा. तसेच एच.ओ.सी.एल कंपनीकडे शिल्लक असलेली जमीन भारत पेट्रोलियम केमिकल्स लिमिटेड (BPCL) कंपनीला देणार नसल्याचे हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स लिमिटेड (HOCL) कंपनीने सुचविले, सबब सदर जमीन राज्य शासनास परत करणेबाबत केंद्र शासनाच्या संबंधित विभागास विनंती करण्यात यावी" असा निर्णय घेण्यात आला.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील अवैधरित्या गौण खनिज उत्खनन प्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(२२) * १७१४७ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील सर्व्हे नं २५२ अ, २५२ ब,२५५ अ २५६/२ व ४ २५७ हि.नं २१९,३,४,५ १०/१ व ११ सर्व्हे नं २५८,२५९,२८४ या ठिकाणी शासनाने दिलेल्या परवानगीचे उल्लंघन करण्यात येऊन हजारो ब्रासचे गौण खनिज उत्खनन करण्यात आल्याची लेखी तक्रार श्री.स्वप्नील डिकुन्हा यांनी तहसिलदार, वसई (जि.पालघर) यांच्याकडे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, वसई यांनी पंचनामे करुन श्री.सतिश जमनादास दत्ताणी (रा. सांडोर) यांना १५,९१७ ब्रास मातीचे उत्खनन केल्याप्रकरणी रुपये ८ कोटी ६६ लाख ५० हजार इतकी रक्कम शासनास जमा करण्याबाबत लेखी आदेशाद्वारे दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदेश दिल्यानंतरही जमिनमालक व विकासकाने दीड वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही दंडाची रक्कम जमा केलेली नसतानाही तहसिलदार, वसई यांनी दोषींविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या गौण खनिज उत्खनन करणाऱ्या दोषीविरुद्ध तसेच संबंधित तहसिलदारांविरुद्ध कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे सांडोर, ता.वसई येथील स.नं.२५२अ, २५५अ, २५६/२ व ४, २५७ हि.नं. २/१, ३, ४, ५, १०/१ व ११ व स.नं. २८४अ या जमिनीत माती उत्खनन होत असल्याबाबतची तक्रार दिनांक ०२/११/२०१९ रोजी उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, वसई यांना लेखी स्वरुपात प्राप्त झाली सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, माणिकपूर यांनी मोजमाप घेऊन तहसिलदार वसई यांना दिनांक ०४/१२/२०१९ रोजी अहवाल सादर करुन मौजे २५२/अ, २५५अ, २५६/२ व ४, २५७/२/१, ३, ४, ५, १०/१ व ११ व २८४ या जमिनीत एकूण ११३४८ ब्रास माती उत्खनन केल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

त्यानुषंगाने तहसिलदार, वसई यांनी विकासक व जागा मालक यांना कारणे दाखवा नोटीस दिली. सदर नोटीसानुसार तहसिलदार, वसई यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये घेतलेले भरावाचे मोजमाप मान्य नसल्याचे लेखी व तोंडी स्वरुपात कळविण्यात आले.

त्यानुसार दिनांक ०४/०२/२०२० रोजी निवासी नायब तहसिलदार, वसई यांनी मंडळ अधिकारी माणिकपुर यांचे समवेत मौजे सांडोर येथील स.नं. २५५अ, २५२अ, २५६/२, २५६/४, २५७/२/१, २५७/३, २५७/४, २५७/५, २५७/१०/१, २५७/११ या जागेचे पुनश्च मोजमाप केले असता सदर जागेत एकूण एकंदर १७,९१७.३६ ब्रास माती उत्खनन झाल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. यानुसार जागा मालक यांना आपले म्हणणे दाखल करणेकामी वेळोवेळी सुनावणी घेणेत आलेली आहे व हे प्रकरण निर्णयाकामी बंद करणेत आलेले आहे.

जमीन मालक यांनी वेळोवेळी घेतलेल्या सुनावणीचे वेळी मौजे सांडोर स.नं. २५२अ या जागेत उपविभागीय अधिकारी, वसई यांचे कार्यालयाकडून २००० ब्रास माती उत्खनन करणेची परवानगी घेतल्याचे कागदपत्र तसेच सदर बांधकाम हे पूर्ण ले-आऊट मध्ये चालु असून त्याची प्रत दाखल केलेली

आहे व वसई विरार शहर महानगरपालिका नुसार स.नं. २५६/२ व ४, स.नं. २५७/२/१, ३,४,५, १०/१ व ११, स.नं. २५५/अ, २५२अ या जागेत मंजुरी दिलेबाबत कागदपत्र दाखल केली आहे. सदरच्या ठिकाणी माती उत्खनन करण्यासाठी विकासकाने उपविभागीय अधिकारी, वसई यांचेकडून २००० ब्रास माती उत्खनन करुन हस्तांतरण करण्याची परवानगी विकासकाने घेतली होती. त्यानुसार उत्खननधारक यांनी केलेल्या एकूण १७९१७.३६ ब्रास मधून २००० ब्रास परवानगीची रक्कम वजा जाता उर्वरीत १५,९१७.३६ एवढे ब्रास माती उत्खनन हे विनापरवाना केलेले दिसून आल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८(७) अन्वये मौजे सांडोर, ता.वसई येथील २५५अ, २५२ व २५५, २५६/२ व २५६/४, २५७/२/१, २५७/३, २५७/४, २५७/५, २५७/१०/१, २५७/११ व २८४ या जागेत अनधिकृतपणे १५,९१७.३६ ब्रास माती उत्खनन केलेबाबत तहसिलदार, वसई यांनी दिनांक ०३/०५/२०२१ च्या आदेशान्वये रुपये ८,६६,७०,०२५/- अक्षरी (आठ कोटी सहासष्ट लाख सत्तर हजार पंचवीस रुपये मात्र) इतक्या रकमेचे आदेश पारित केलेले आहे.

तथापि, जमीन मालक यांनी सदर आदेशाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटिशन नं. २१३७ Of २०२१ दाखल केलेली असून प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## राज्यात पर्जन्यमापक यंत्रे बसविताना भारतीय हवामान खात्याच्या नियमांचा अवलंब न केल्याबाबत

**(२३) * १७९३६ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेती पिकांच्या तसेच घराच्या पडझडीच्या नुकसान भरपाईसाठी पर्जन्यमापकावर होणारी पावसाची मोजणी महत्वपूर्ण ठरत असल्याने पर्जन्यमापक यंत्रे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीशी पीपीपी तत्वावर करार करुन सदर कंपनीद्वारे राज्यात २ हजार ६५ पर्जन्यमापक यंत्रे बसविण्यात आली असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारतीय हवामान खात्याच्या नियमानुसार पर्जन्यमापक यंत्र हे उंच इमारत, झाड व पाण्याच्या स्त्रोतापासून लांब असणे गरजेचे असताना कृषि विभागाकडून पर्जन्यमापक यंत्र बऱ्याच ठिकाणी चुकीच्या जागेवर बसविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चुकीच्या जागेवर यंत्र बसविल्यामुळे यंत्राद्वारे पर्जन्यमानाची चुकीची आकडेवारी दर्शविण्यात येवून अतिवृष्टीग्रस्त तालुक्याच्या यादीतून अनेक गावे वगळण्यात आली असल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भारतीय हवामान खात्याच्या नियमाचा अवलंब न करता चुकीच्या ठिकाणी पर्जन्यमापक यंत्र बसविणाऱ्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांसह स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या व्यवस्थापनाविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत राज्यामध्ये महसूल मंडळ स्तरावर स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रायव्हेट लि. यांचेमार्फत २१२७ स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापित करण्यात आलेली आहेत.

(३) हे खरे नाही.

World Meteorological Organization (WMO) च्या निकषाप्रमाणे अधिकाधिक योग्य असलेल्या जागेत हवामान केंद्रे बसविलेली आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेटफळ (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील बारामती ॲग्रो लि. या कारखान्याने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत

**(२४) * १८१४० प्रा.राम शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५७५० ला दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेटफळ (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील बारामती ॲग्रो लि. या साखर कारखान्याने गाळप हंगाम दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ पूर्वी सुरू करून शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित साखर कारखान्याच्या व्यवस्थापकांसह तसेच सूट दिलेल्या साखर आयुक्तांवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला असून अहवालाची छाननी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाची छाननी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.

(२) व (३) होय.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारीची चौकशी करण्यासाठी श्री.अजय देशमुख, द्वितीय विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), पुणे यांना चौकशी करणेस्तव प्राधिकृत केले होते. तथापि, चौकशी अधिकारी श्री.अजय देशमुख यांनी चुकीचे अहवाल सादर केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण

नियमन) आदेश १९८४ मधील खंड ४ चा भंग झाला असल्याचे निदर्शनास आल्यामुळे बारामती ॲग्रो लि. शेटफळ (ता.इंदापूर, जि.पुणे) कारखान्याविरुद्ध आवश्यक कारवाई करण्याबाबत साखर आयुक्त, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाफगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील यशवंतराव होळकर वाड्याचे सुशोभिकरण करण्याबाबत

**(२५) * १७०११ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाफगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील यशवंतराव होळकर यांचा सद्य:स्थितीत रयत शिक्षण संस्थेच्या अखत्यारित असलेला ऐतिहासिक महत्त्व लाभलेला वाडा अतिशय दुर्गम अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी सदरहू वाडा हा रयत शिक्षण संस्थेकडून काढून पुरातत्व विभागाकडे देण्यात यावा व त्याची डागडुजी करून सुशोभिकरण करण्यात यावे, अशी मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ३ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वाडा राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू वाडा ताब्यात घेऊन त्याची डागडुजी करण्याबाबत तसेच त्यास राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

यशवंतराव होळकर यांच्या वाड्याची काही प्रमाणात दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

तथापि, अशा आशयाची मागणी श्री.भगवानराव जऱ्हाड, महासचिव, श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर स्मारक संवर्धन समिती यांनी दिनांक ०२/०२/२०२१ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांना केली आहे.

(३) व (४) होय. हे खरे आहे.

वाफगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील यशवंतराव होळकर वाडा राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची बाब विचाराधीन आहे. सदर वाडा राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झाल्यानंतर दुरुस्तीसंदर्भात नियोजन करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भ व मराठवाडा विभागांतील एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत मंजूर निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२६) * १६९६२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ-मराठवाडा विभागातील शेतकरी आत्महत्याग्रस्त १९ जिल्ह्यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सन २०२२-२०२३ या वर्षासाठी रुपये ४१.९३ कोटी मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहिती अधिकारी, राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीन्वये उक्त मंजूर निधींपैकी रुपये १६.१९ कोटींचा निधी खर्च करण्यात येऊन रुपये २५ कोटी ७३ लाखांचा निधी अखर्चित राहिल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्वाधिक रुपये ८.९८ कोटींचा निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत देण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांचा निधी पुनर्जीवित करण्यासाठी पाठपुरावा करुन निधी अखर्चित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

सन, २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी विदर्भ व मराठवाड्यासाठी रुपये ८३.३५ कोटींचा कार्यक्रम मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच रुपये ३४.८९ कोटी निधी मर्यादा उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यापैकी माहे जानेवारी, २०२३ अखेर रुपये २८.३५ कोटी निधी खर्च झालेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गौण खनिजांचे उत्खनन करणाऱ्या व्यावसायिकांना गौण खनिज परवान्यांचे वितरण करण्याबाबत

**(२७) * १८१८३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गौण खनिजांचे उत्खनन व वाहतूक करणारी वाहने यावर लक्ष ठेवण्यासाठी मेसर्स शौर्या टेक्नोसॉफ्ट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला कार्यादेश देण्यात येऊन ‘महाखनिज’ ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवान्यांची नोंदणी, गौण खनिजांशी संबंधित आवश्यक कार्यवाही, परवान्यांसाठी मागणी अर्ज स्विकारणे, गौण खनिजांच्या वाहतुकीसाठी पेपरलेस ईटीपी क्रमांक उपलब्ध करणे हे सर्व 'महाखनिज' या संगणकीय प्रणालीमार्फतच करण्यात यावे असे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना व विभागीय आयुक्तांना निदेशित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणात इंटरनेट सेवा उपलब्ध नसल्याने जांभा दगड, वाळू, रेती अशा विविध गौण खनिजांचे उत्खनन करणाऱ्या व्यावसायिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जांभा दगड, वाळू, रेती अशा विविध गौणखनिजांचे उत्खनन करणाऱ्या व्यावसायिकांना दिलासा देण्यासाठी गौण खनिज परवाने वितरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यात अवैध खनिज उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी व गौण खनिजाचे सनियंत्रण करण्यासाठी शासनाकडून संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान विभाग) मान्यतेअंती मा.उच्चाधिकार समितीने मे. शौर्या टेक्नोसॉफ्ट प्रा.लि. यांची निविदा मंजूर करण्यात आली. तद्नंतर मे. शौर्या टेक्नोसॉफ्ट प्रा.लि. यांना कार्यारंभ आदेश देण्यात येवून सदर कंपनीची राज्यस्तरीय System Integrater म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याबाबत आणि गौण खनिजाचे उत्खनन व वाहतुकीबाबतची "महाखनिज" ही संगणक प्रणाली वापराबाबत विभागीय आयुक्त (सर्व) व जिल्हाधिकारी (सर्व) यांना निर्देश दिले आहेत.

तसेच परवान्यांची नोंदणी, गौण खनिजांशी संबंधित आवश्यक कार्यवाही, परवान्यासाठी मागणी अर्ज स्विकारणे, गौण खनिजांच्या वाहतुकीसाठी ईटीपी क्रमांक उपलब्ध करणे, इत्यादी सर्व "महाखनिज" या संगणक प्रणालीमार्फत करण्याबाबत दिनांक २१/०७/२०२१ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त (सर्व) व जिल्हाधिकारी (सर्व) यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

कोकणात जांभा दगड, वाळू, रेती अशा विविध गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्या व्यावसायिकांना इंटरनेट सेवा उपलब्ध नसल्यास अशा व्यावसायिकांना गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्या ठिकाणापासून नजिकच्या ठिकाणी इंटरनेट सेवा उपलब्ध करून देता येऊ शकते.

-----------------

## डाकू पिंपरी (ता.पाथरी, जि.परभणी) येथील अवैध वाळू उपसाप्रकरणी वसुलीची कार्यवाही करण्याबाबत

**(२८) * १७२०१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डाकू पिंपरी (ता.पाथरी, जि.परभणी) येथील वाळू धक्क्यातून अवैध वाळू उत्खनन केल्याप्रकरणी जिल्हा प्रशासन, परभणी यांनी संबंधितांकडून दीड कोटी रूपयांची रक्कम व वाहन धारकांकडून रुपये २५ लक्षांची वसुली करण्याबाबतचे आदेश सन २०२२ दरम्यान काढण्यात आले असून महाराष्ट्र जमीन महसूल

अधिनियमामधील तरतूदीनुसार वसुलीबाबत प्रक्रिया करण्यात येऊन दोन्ही रक्कमांची प्रत्यक्षात वसुली करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर जिल्हाधिकारी, परभणी यांनी अवैध वाळू उपसा, कुळ प्रकरणे, इनामी जमीन सुनावणी व इतर प्रकरणांत आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी नदी बचाव आंदोलन व सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०२२-२०२३ दरम्यान मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे लेखी तक्रार केली आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोंदविलेल्या तक्रारीच्या निवेदनात वाळू तस्कर व अप्पर जिल्हाधिकारी, परभणी यांच्यातील भ्रमणध्वनीमधील संभाषणाची मागील वर्षभरातील CDR काढून त्याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अप्पर जिल्हाधिकारी, परभणी यांनी केलेल्या नियमभंग व इतर गैरव्यवहारासंदर्भात त्यांच्याविरूद्ध विभागीय चौकशीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, परभणी यांनी शासनाकडे सन २०२२ दरम्यान पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व प्रकरणांची मा.मुख्य सचिव यांच्या स्तरावरून चौकशी करण्यात येऊन संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) सन २०२१-२०२२ मधील मौजे डाकु पिंपरी (ता.पाथरी, जि.परभणी) या रेतीस्थळातून संबंधित लिलावधारक यांनी ७२०.२१५ ब्रास वाळूचे विना ईटीपी (eTP) वाहतूक केल्याने उपविभागीय अधिकारी, पाथरी यांच्या दिनांक २२/०८/२०२२ च्या आदेशान्वये रुपये १,२८,३४,२३१/- एवढया रकमेची दंडात्मक कार्यवाही केली आहे. सदर दंडात्मक रक्कम लिलावधारक यांनी शासन जमा न केल्याने लिलावधारक यांच्याकडून सदर रक्कम वसुल करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार सुरू आहे.

मौजे डाकुपिंपरी (ता.पाथरी) या रेतीघाटातून ०१ हायवा विना ईटीपी (eTP) वाहतूक करताना आढळून आल्याने हायवा वाहन मालक यांच्याकडून रुपये २,००,०००/- इतकी दंडाची रक्कम वसूल करून शासन जमा करण्यात आली. तर सदर रेतीघाटावर अवैध उत्खनन करताना ०४ पोकलेन आढळून आल्याने त्यांच्या मालकाविरूद्ध दंडात्मक कारवाईचे आदेश उपविभागीय अधिकारी, पाथरी यांनी पारित केले यापैकी ०२ पोकलेन मालक यांच्याविरूद्ध पारित करण्यात आलेले आदेश अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक ०२/०५/२०२२ व ०५/०८/२०२२ च्या आदेशान्वये रद्द केले. तर उर्वरीत ०२ पोकलेन मशीनच्या अनुषंगाने असलेली दंडात्मक रक्कम तहसिलदार, पाथरी यांचेमार्फत वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

नदी बचाव आंदोलन निवेदनकर्ते रेतीघाट संदर्भात अनियमितता व त्यांच्या संभाषणाचे सिडीआर या विषयावर मा.मुख्य सचिव यांचे नावे केलेली निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, परभणी यांना दिनांक ३०/०५/२०२२ रोजी प्राप्त झाली आहे. परंतु, निवेदनकर्ते यांचे निवेदन मा.मुख्य सचिव यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

तत्कालीन अपर जिल्हाधिकारी यांनी केलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने त्यांच्याविरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने तत्कालीन अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी आर्थिक अनियमितता याची तपासणी करून विभागीय चौकशीचा फेर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना शासनाने दिनांक ०३/११/२०२२ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना दिल्या आहेत.

-----------------

## वसमत (जि.हिंगोली) तालुक्यात हळद संशोधन प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(२९) * १७७१८ श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १६७०४ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यात ६६ एकर जागेवर बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्र सुरु करण्याबाबत शासनामार्फत रुपये ११ कोटींच्या निधीची तरतुद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू केंद्र सुरु करण्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेवर प्रगत बाजार संकुल स्थापन करण्याचीदेखील मान्यता देण्यात आली असून शासनाकडून दोन प्रकल्पांसाठी एकाच जागेची निवड करण्यात आल्याने मा.न्यायालयाने सदर जागेबाबत कोणतेही आदेश निर्गमित केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर हळद संशोधन केंद्र रोजगाराच्या व शेतकऱ्यांच्यादृष्टीने महत्वाचे असल्याने त्यास मान्यता देवून प्रगत बाजार संकुलासाठी अन्य जागेचा पर्याय उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ मध्ये बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राकरीता रुपये १०.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी अध्यक्षाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदरहू केंद्रासाठी नियामक मंडळ व कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

सदर जमिनीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल रिट याचिका क्रमांक १०७९४/२०२२ प्रकरणी दिनांक ०६/०२/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका Dismissed केली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली पूर्व (जि.ठाणे) येथील चंद्रेश वास्तू (एफ) सहकारी गृहनिर्माण सोसायटीमध्ये अनधिकृतरित्या बांधकाम केल्याबाबत

**(३०) * १८२३४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली परिसरातील बहुतांशी सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेप व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृत बांधकाम करण्याचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली पूर्व (जि.ठाणे) येथील लोढा हेरिटेजमधील चंद्रेश वास्तू (एफ) सहकारी गृहनिर्माण सोसायटीमध्ये शासनाच्या नियमाचा अवलंब न करता अनधिकृतरित्या बांधकाम तसेच अवैधपणे निवडणूक घेण्यात आल्याने सोसायटीच्या सदस्यांनी संबंधित पदाधिकाऱ्यांविरोधात मा.मंत्री, सहकार व पणन यांच्याकडे दिनांक २१ डिसेंबर, २०२२ व दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संकुलामध्ये दरवर्षी दिनांक १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी करण्यात येणाऱ्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी नियुक्त केलेल्या सभासदांऐवजी प्रशासकाने राजकीय कार्यक्रम आयोजित करणे, ध्वजाजवळील शोभिवंत झाडे व त्या झाडांना संरक्षित करण्याकरीता लावलेले ग्रील हटविणे, त्यासाठी अंदाजे एक ते दीड लाख रुपयांचे नुकसान करणे, दिनांक २१ व २२ जानेवारी, २०२३ रोजी उद्यानामध्ये रात्रभर कार्यक्रमाचे आयोजन करणे, इ. कामे सोसायटीच्या सदस्यांच्या परवानगीने करण्यात न आल्याने गृहनिर्माण संस्थांनी मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली यांच्याकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डोंबिवली परिसरातील अन्य भागात तसेच चंद्रेश वास्तू (एफ) सहकारी गृहनिर्माण सोसायटीमध्ये राजकीय हस्तक्षेप व अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधित प्रशासकाविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) काही अंशी विनापरवानगी बांधकामाच्या अनुषंगाने ही बाब अंशत: खरी आहे.

(२) होय. दिनांक २१/१२/२०२२ रोजीचे निवेदन सहकार विभागास प्राप्त झाले आहे.

चंद्रेश वास्तू (एफ) सहकारी गृहनिर्माण सोसायटी परिसरात सोसायटीचे कार्यालय, शौचालयाचे बांधकाम, पहिल्या मजल्यावरील तसेच इमारतीच्या टेरेसवरील पावसाळी शेडचे बांधकाम विनापरवानगी असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना आढळून आले आहे, असे नगरविकास विभागाने या विभागास कळविले आहे.

(३) व (४) लोढा हेरिटेज को-ऑप.हौसिंग सोसा. असोसिएशन लि. मध्ये १३ संस्था असून दिनांक २६/०१/२०२३ रोजीच्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमासाठी असोसिएशनमधील सामायिक जागा वापरासाठी ९ संस्थांनी मागणी केली होती व त्या संस्थांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

सदर कार्यक्रमासंदर्भात उपनिबंधक, सहकारी संस्था, डोंबिवली यांचेकडे दिनांक १८/०१/२०२३ रोजीचा तक्रार अर्ज प्राप्त झाला होता.त्यानुषंगाने प्राधिकृत अधिकारी श्री.शिवाजी राठोड यांच्याकडून मुद्देनिहाय माहिती घेण्यात आली असता लोढा हेरिटेज को-ऑप.हौसिंग सोसा. असोसिएशन लि. मधील ९ संस्थांच्या मागणीप्रमाणे कार्यक्रमासाठी सामायिक जागा वापरण्यासाठी परवानगी दिली होती. सदर कार्यक्रमाचे आयोजन ९ संस्थांच्या सभासदांनी केले होते.

(५) चंद्रेश वास्तू (एफ) सहकारी गृहनिर्माण सोसायटी या संस्थेवर दिनांक १५/०२/२०२३ रोजी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गृहनिर्माण संस्थांच्या परिसरातील अनधिकृत बांधकाम हा विषय सहकार विभागाच्या अखत्यारीतील नसून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा आहे. याबाबत नगरविकास विभागाकडून या विभागास कळविल्यानुसार, प्रभाग समिती कार्यालयाकडून कायदेशीर बाबींचा (डी.पी.एल.) अवलंब करुन सदरची बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून करण्यात येणार आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी पाणीपुरवठा संस्थांना अनुदान देण्याबाबत

**(३१) * १७३३४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकारी पाणीपुरवठा संस्थाना दिनांक १९ नोव्हेंबर, १९९४ च्या शासन निर्णयानुसार शासनामार्फत २५ टक्के अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी ज्या सहकारी पाणीपुरवठा संस्था स्थापन झाल्या आहेत अशा संस्थांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याने आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी स्थापन झालेल्या संस्थानाही अनुदान देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.

(२) उपसा जलसिंचन सहकारी योजनांच्या प्रकल्प खर्चाचा लाभधारक शेतकरी सभासदांवरील बोजा कमी करण्यासाठी दिनांक १९/११/१९९४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के अथवा रुपये १ कोटी यापैकी कमी असेल ती रक्कम एकवेळ अनुदानाच्या स्वरुपात दिली जाते.

योजनेसाठी दिनांक १/०१/१९९४ रोजी ज्या संस्थांची कर्ज मागणी प्रकरणे वित्तीय संस्थांकडे प्रलंबित होती व ज्या संस्थांनी प्रकल्प उभारणीस सुरुवात केली नव्हती अशा संस्था या योजनेंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यासाठी पात्र आहेत.

तथापि, सन १९९४ पूर्वी स्थापन झालेल्या उपसा जलसिंचन संस्थांकडून याबाबतच्या तक्रारी क्षेत्रिय कार्यालये अथवा सहकार आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यामध्ये केळी पिकांवर कुकुंबर मोझॅक व्हायरस (सीएमव्ही) या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(३२) * १७६४८ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १५२९० ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात अंदाजित ४५ हजार हेक्टर क्षेत्रांवर केळीचे पीक घेतले जात असून हेक्टरी ७० ते ५० टन एवढे उत्पादन मिळते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केळी पिकांवर मागील चार महिन्यांपूर्वी प्रादुर्भाव झालेल्या कुकुंबर मोझॅक व्हायरस (सीएमव्ही) या विषाणूजन्य रोगाची पाहणी करण्याकरीता रावेर (जि.जळगाव) तालुक्यात केंद्रीय कीड व्यवस्थापन पथकाने दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास भेट दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, किडीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या केळी पिकाची नुकसान भरपाई करण्याऐवजी नवीन रोपांच्या लागवडीसाठी अनुदान देण्याबाबत राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उतीसंवर्धीत केळी रोपांची निर्मिती बी-बियाणे गुण नियंत्रण अधिनियमांतर्गत समावेश करून केळी उत्पादकाच्या हिताचा निर्णय घेण्याबाबत तसेच सीएमव्ही रोगाचे प्रतिबंधात्मक व निर्मूलनात्मक उपाययोजनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०२०-२१ च्या अंतिम अंदाजानुसार जळगाव जिल्ह्यात केळीचे क्षेत्र ४४,९२९ हेक्टर असून उत्पादकता हेक्टरी ७० टन आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सीएमव्ही या रोगाच्या प्रादुर्भावाने बाधित क्षेत्राचे संयुक्त पंचनामे करण्यात आले असून कीडीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या केळी पिकाची नुकसान भरपाई करण्याऐवजी नवीन रोपांच्या लागवडीसाठी अनुदान देण्याबाबत प्रस्ताव महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागास पाठविण्यात आला आहे.

ऊतीसंवर्धीत केळी रोपांची विक्री करण्यासाठी बियाणे कायद्यांतर्गत परवाना दिला जातो.

सीएमव्ही रोगाचे प्रतिबंधात्मक व निर्मूलनात्मक उपाययोजनेची कृषि विभागामार्फत कृषि विस्तार माध्यमाव्दारे कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची चौकशी करण्याबाबत

**(३३) * १७७३६ डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १२५२३ ला दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील अनेक गावांत वैयक्तीक व सार्वजनिक सिंचन विहिर, पाणंद रस्ते, बिहार पॅटर्न, गुरांचे गोठे इत्यादी कामे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत काम करणारी प्रशासकीय यंत्रणा शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार काम न करता आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन योजना राबवित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने विहित केलेल्या नियमांचे उल्लंघन करुन अधिकाराचा गैरवापर करुन योजना राबविणाऱ्या दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हास्तरीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग निर्मितीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या जी.आर. एंटरप्रायझेस कंपनीने अवैध उत्खनन केल्याबाबत

**(३४) * १७१४८ श्री.महादेव जानकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग निर्मितीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या जी.आर. एंटरप्रायझेस कंपनीने मु.पो.ता.सफाळे (जि.ठाणे) रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील नवघर गट क्र.१८८ मधून ८ हजार ब्रास मुरूम उत्खननाचा परवाना असताना सुमारे दीड लाख ब्रास मुरुम व मातीचे अवैध उत्खनन केल्याची लेखी तक्रार ग्रामस्थांनी शासनाकडे दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणचे मंडळ अधिकारी, तलाठी व तक्रारदार ग्रामस्थ यांनी संयुक्तरित्या केलेल्या पाहणीत व मोजणीत उक्त कंपनीने उत्खननाच्या परवान्याची मुदत संपल्यानंतरही उत्खनन सुरु ठेवून १ लाख ६० हजार ब्रासचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जी.आर.इन्टरप्राइज कंपनीने उत्खनन परवान्याची मुदत संपल्यानंतरही अवैध उत्खनन केल्याप्रकरणी तसेच सदर कंपनीला सहकार्य करणाऱ्या संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे नवघर येथील गट नं. १८८, १८९, १९०, १९१, १९२ मधून कोणत्याही प्रकारची उत्खनन किंवा वाहतूक परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात मुरुम-मातीचे उत्खनन केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी तहसिलदार, पालघर यांचेकडे दिनांक २१/०७/२०२२ रोजी व दिनांक ०५/०१/२०२३ रोजी केली आहे

मंडळ अधिकारी, सफाळे व तलाठी, करवाळे यांनी दिनांक ०७/१२/२०२२ रोजी केलेला स्थळपाहणी अहवाल तहसिलदार, पालघर यांना सादर केला आहे. तक्रारदार यांनी तक्रार अर्जातील नमूद गट नं. १८९, १९०, १९१, १९२ मध्ये कोणतेही उत्खनन झाल्याचे आढळून आलेले नाही. परंतु, मौजे नवघर ता.जि.पालघर येथील स.नं/गट नं. १८८ एकूण ५७,५८८ ब्रास मुरुम-मातीचे उत्खनन केल्याचे आढळून आले.

त्यानुसार तहसिलदार, पालघर यांचेकडून संबंधित कंपनीस दिनांक ०८/१२/२०२२ रोजी एकूण ५७,५८८ ब्रास अनधिकृत मुरुम-माती उत्खनन केल्याबाबत नोटीस देण्यात येवून दिनांक १९/१२/२०२२, दिनांक २९/१२/२०२२ व ०९/०१/२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीमध्ये संबंधित कंपनीने सादर केलेला खुलासा विचारात घेऊन तहसिलदार, पालघर यांनी संबंधित कंपनीस दिनांक ०८/१२/२०२२ रोजी दिलेली नोटीस दिनांक ०६/०२/२०२३ अन्वये मागे घेण्यात आली आहे.

-----------------

## कर्जत-जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यात मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गातील कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३५) * १८१४१ प्रा.राम शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५७५६ ला दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत-जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यात मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गातील कामांमध्ये रुपये २० कोटींचा गैरव्यवहार झाल्याने सदरहू गैरव्यवहाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, रोजगार हमी योजना, मा.मंत्री, फलोत्पादन यांना दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी तसेच मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चार सदस्यीय समिती गठित करण्यात येऊन उक्त समितीस चौकशी करुन एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे निदेशित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पाणंद रस्ते व रोजगार हमी योजनेंतर्गत कर्जत-जामखेड तालुक्यात झालेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीच्या अनुषंगाने अहवाल सादर करुन संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) चौकशी समिती गठित करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील झाडे कुणबी प्रवर्गातील लोक गैरमार्गाने भटक्या जमाती "क" प्रवर्गाचे जात व वैधता प्रमाणपत्र मिळवित असल्याबाबत

**(३६) * १६९४३ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा, गडचिरोली, चामोर्शी, मूलचेरा, अहेरी, भामरागड तालुक्यात मोठ्या प्रमाणात झाडे कुणबी या जातीचे लोक वास्तव्यास असून त्यांची जात इतर मागास प्रवर्गात मोडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर मागास प्रवर्गात फार सवलती नसल्याने झाडे कुणबी या जातीतील लोकांकडून कुणबी हा शब्द वगळून धनगर अनु. क्र. १५ वरील झाडे या पोटजातीचा आधार घेऊन भटक्या जमाती "क" या प्रवर्गातील असल्याचे दाखवून बनावट झाडे जातीचे जात प्रमाणपत्र प्रशासकीय कार्यालयाकडून मिळविण्यात येवून गैरमार्गाने भटक्या जमातीच्या आरक्षित जागेवर शासकीय सेवेत रुजू होवून जात पडताळणी कार्यालयाकडून जात वैधता प्रमाणपत्र मिळवित असल्याचेही माहे डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात झाडे कुणबी या प्रवर्गातील लोक वास्तव्यास असून कुणबी मध्ये काही पोटजातीनुसार जसे की खेळूले कुणबी, खैर कुणबी, झाडे कुणबीनुसार ओळखले जातात परंतु जात प्रमाणपत्र देताना उपजातीच्या नावाने जात प्रमाणपत्र न देता कुणबी ओबीसी म्हणून दिले जाते, झाडे कुणबी हे धनगरांचे पोट जातीतील झाडे या नावाच्या नामसदृश्याचा फायदा घेण्याच्या उद्देशाने गैरमार्गाचा वापर करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धनगर अधिकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य, शाखा गडचिरोली यांनी यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांना पत्राद्वारे दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देताना आवश्यक ती दक्षता घेण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) झाडे कुणबी या जातीचा इतर मागासवर्ग अथवा भटक्या जमातीमध्ये समावेश नाही.
(२) अशा प्रकारचे दिनांक ०५/१२/२०२२ रोजीचे निवेदन धनगर-अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांचेकडून महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे व महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या कार्यालयास देण्यात आले आहे.

(३) खेळूले कुणबी, खैरे कुणबी, झाडे कुणबी यांचा इतर मागासवर्ग मध्ये समावेश करण्यात आलेला नाही.
(४) हे खरे आहे.
(५) व (६) अर्जदारांनी नमूद केलेली आडनावे, त्यांचे रोटी-बेटी व्यवहार, रुढी परंपरा, कुटुंबीयांचा परंपरागत व्यवसाय, याबाबत केलेली गुप्त चौकशी, गृहचौकशी, दक्षता पथकाने केलेली गृहचौकशी तसेच संबंधित अर्जदारांच्या प्रकरणातील शालेय पुरावे व शेतजमिनीच्या दस्तावेजांचा मूळ अभिलेख मागवून तसेच दक्षता पथकामार्फत पडताळणी केली असता या जातीच्या काही व्यक्तीच्या शेत जमिनीच्या सन १९२२-२३ व लगतच्या कालावधीतील पी-१ (बंदोबस्त मिसळ) आदी दस्तऐवजात "झाडे कु., "झाडे कुणबी", "झाडे कुनबी" असा उल्लेख आढळून येत असल्याने गडचिरोली समितीने अशा प्रकरणात "अवैध" आदेश निर्गमित केलेले आहेत.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३७) * १७०९७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन उत्पादकांना निकषाप्रमाणे ३८ हजार नुकसान भरपाई देणे आवश्यक असताना शासनामार्फत नियुक्त विमा कंपनीने प्रत्यक्षात रुपये १५/- ते रुपये २०००/- इतकी तुटपुंजी नुकसान भरपाई देण्यात आल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणातील प्रत्येक शेतकऱ्याने रुपये १,३००/- इतका विमा हप्ता भरलेला असतानाही त्याच्या एक टक्का भरपाईदेखील शेतकऱ्याला मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन शेतकऱ्यांना निकषाप्रमाणे नुकसान भरपाई न देणाऱ्या विमा कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.
प्रधानंत्री पीक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे. सदर मार्गदर्शक सुचनांनुसार पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम अत्यंत कमी प्रमाणात येत असल्यास शासन निर्णय दिनांक ३१ मे, २०१९ नुसार वैयक्तीक शेतकऱ्यास विमा योजनेंतर्गत सर्व अर्ज मिळून हंगामाच्या शेवटी किमान नुकसान भरपाई रुपये १०००/- देण्यात येते.
(२) हे खरे नाही.
स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत पीक वाढीची अवस्था, नुकसानग्रस्त क्षेत्र, नुकसानग्रस्त क्षेत्रावरील पीक नुकसानीचे प्रमाण या तिनही घटकांची माहिती सर्वेक्षणाव्दारे घेण्यात येऊन नुकसान भरपाई अंतिम करुन देण्यात येते.

(३) योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२२ मध्ये, जळगाव जिल्ह्यात कापूस या पिकाकरीता स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत ४८४३३ शेतकरी अर्जदारांना रुपये ३१.५१ कोटी निश्चित करुन वाटप करण्यात आले आहेत. तसेच उत्पादनावर आधारीत नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही सुरु आहे.

सोयाबीन पिकाकरीता स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत २५१७ शेतकरी अर्जदारांना रुपये १.२३ कोटी निश्चित करण्यात आली असून त्यापैकी दिनांक १३/०२/२०२३ अखेर, २५०६ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १.२२ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत ३२० शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये २५.१० लाख निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच उत्पादनावर आधारीत नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वन्यप्राण्यांच्या नागरिकांवरील हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(३८)** * **१७३३६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून वर्षभरात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे ४ जण मृत्यूमुखी पडले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे अनेक नागरिकांना कायमचे अपंगत्व आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वन्यप्राण्यांचे नागरिकांवर होणारे हल्ले रोखण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २३/०५/२०२२ रोजी गवा या वन्यप्राण्याच्या हल्ल्यात श्री.शिवाजी शंकर सावंत, रा. शेळोशी, तालुका भुदरगड यांचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. तसेच दिनांक २१/१२/२०२२ रोजी कु. मनिषा रामू ऊर्फ राया डोईफोडे, रा.पुसार्ले धनगरवाडा, केदारलिंगवाडी, ता.शाहुवाही यांचा बिबट वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) दिनांक २६/०३/२०१९ रोजी श्री.मनोहर मारुती चांदम, रा.चांदमवाडी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर व दिनांक २६/१२/२०२१ रोजी श्री.सुभाष दत्तात्रय देसाई, रा.गिरगाव, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर यांना गवा या वन्यप्राण्याच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने अपंगत्व आले आहे.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित व्यक्तीस अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(३) क्षेत्रिय स्तरावर मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांमुळे पीक नुकसान, पशुधन हानी, मनुष्य जखमी/ मृत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधितास तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्यात येते. त्याकरीता ऊणे (-) प्राधिकाराची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- वन्यप्राणी वावर असलेल्या क्षेत्रामध्ये वन कर्मचारी दिवस-रात्र गस्त घालून वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येतात.
- वन्यप्राणी वनक्षेत्रातून मानवी वस्तीत आल्यास त्यास परत त्याच्या नैसर्गिक अधिवासात परत पाठविण्यासाठी जलद बचाव पथकाची स्थापना करण्यात आली आहे.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वनक्षेत्रात जल व मृद संधारणाची कामे करण्यात येतात.
- वनक्षेत्रात गवती कुरणांच्या विकासाची कामे करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दरवर्षी पावसाळयापूर्वी राबविण्यात येणाऱ्या वृक्षारोपण मोहिमेची योग्यरितीने अंमलबजावणी करणेबाबत

**(३९)** * **१७७७४ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी पावसाळयापूर्वी वृक्षारोपणाची मोहीम राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध वनपरिक्षेत्रातील मिश्र रोपांचे वृक्षारोपण करण्यात येवून त्यावर लाखो रूपये खर्च करुनही अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे झाडांची योग्य निगा न राखल्याने झाडे जगण्याचे प्रमाण अत्यल्प असून या वृक्षारोपणासाठी शासनाने केलेला खर्च वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वृक्षारोपणावर लाखो रुपये खर्च करुनही अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे झालेल्या नुकसानीबाबत संबंधित दोषींवर कारवाई करुन वृक्षारोपणात तज्ञांचे सहकार्य घेवून या झाडांची योग्य निगा व देखभाल करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय हे खरे आहे.

राज्यात दरवर्षी वृक्षारोपणाची मोहिम राबविण्यात येते, पावसाळयापूर्वी पूर्व पावसाळी कामे पूर्ण करण्यात येतात व पावसाळ्यात रोप लागवडीची कामे केली जातात.

(२) हे खरे नाही.

राज्य शासन व केंद्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून राज्यात विविध वनपरिक्षेत्रात दरवर्षी नियोजनबद्ध रितीने वृक्षारोपण करण्यात येते. त्याकरीता रोपवनांसाठी

अधिकृत नमूना अंदाजपत्रकांचा वापर करून अंदाजपत्रक तयार केले जाते व तद्नुसार कालबद्ध रितीने विहित वेळेत आवश्यक कामे पूर्ण केली जातात.

रोपवनाबाबतची सर्व माहिती वनविभागाच्या अधिकृत www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील ६ मल्टीप्लेक्स थिएटर मालकांनी ग्राहकांकडून प्राप्त रकमेचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(४०) * १७१५६ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ६ मल्टीप्लेक्स थिएटर मालकांनी ग्राहकांकडून रुपये ७१ कोटी २२ लाख वसुल करताना गैरव्यवहार केल्याने थिएटर मालकांनी वसुल केलेली रक्कम दंडासह शासनाला भरण्यात यावी असा निर्णय जिल्हाधिकारी, पुणे, विभागीय आयुक्त, तत्कालीन मंत्री, महसूल यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, पुणे, विभागीय आयुक्त, तत्कालीन मंत्री, महसूल यांनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करताना सबळ पुराव्याचे कारण देत महसूल खात्याचे माजी अतिरिक्त सचिव श्री.अश्वीनी कुमार यांनी सेवानिवृत्त होण्यापूर्वी निर्णय देवून प्रकरण निकाली काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी अतिरिक्त सचिव, श्री.अश्वीनी कुमार यांनी जिल्हाधिकारी, पुणे, विभागीय आयुक्त, व तत्कालीन मंत्री, महसूल यांनी जी वसुली नोटीस थिएटर मालकांना पाठवली होती त्याचा उल्लेख दिलेल्या निर्णयात केला नसल्याने शासनाला सुमारे दीडशे कोटी रुपयांचा मिळणारा महसूल मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माजी अतिरिक्त सचिव, श्री.अश्वीनी कुमार यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत जिल्हा प्रशासन, पुणे यांना मिळण्यास सहा महिन्यांचा विलंब लागल्याने सदर निर्णयाची प्रत पुणे जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांना शासनाकडून घ्यावी लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महसूल विभागाचे माजी अतिरिक्त सचिव श्री.अश्विनी कुमार यांनी उक्त गैरव्यवहार प्रकरणी दिलेल्या निर्णयाचा तपास करुन या निर्णयाची उच्च स्तरावर चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ. व रि.) यांनी त्यांच्या दिनांक ३०/०६/२०२२ रोजीच्या आदेशामध्ये विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिलेल्या आदेशाचा व अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिलेल्या नोटीशीचा उल्लेख आहे.

(४) सहा महिन्यांचा विलंब झालेला नसून, अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ. व रि.) यांनी दिनांक ३०/०६/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या प्रती दिनांक ०४/०७/२०२२ च्या पत्रान्वये दिनांक ११/०७/२०२२ रोजी SPEED POST द्वारे जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेततळे प्लास्टिक अस्तरीकरण योजनेतील नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत

**(४१)** * **१८१५० प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या अवर्षणप्रवण क्षेत्रातील शेतकऱ्यांच्यादृष्टीने शेततळे व शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरण महत्त्वाचे असल्याने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत वैयक्तीक शेततळे प्लास्टिक अस्तरीकरण योजना सन २०२२-२३ या कालावधीकरीता राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या महाडीबीटी प्रणालीअंतर्गत लाभार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन मागविण्यात येऊन त्यांची निवड सोडत पद्धतीने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांनी शेततळे अस्तरीकरणाकरीता ऑनलाईन अर्ज केल्यानंतर त्यांची निवड होईपर्यंतच्या प्रक्रियेस ६ महिने ते दोन वर्षांचा कालावधी लागतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू योजनेच्या निवडप्रक्रियेतील जटील नियमांमध्ये बदल करण्यात येऊन शेततळे अस्तरीकरण अनुदान वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, कृषि यांना दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेततळे अस्तरीकरण अनुदान वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करुन लाभार्थ्यांना सदरहू योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केल्यावर लॉटरी पद्धतीने निवड केली जाते. तद्नंतर निवड झालेल्या लाभार्थ्यांनी कागदपत्रे अपलोड केल्यावर त्यांची कृषि विभागामार्फत छाननी करण्यात येते व पात्र लाभार्थ्यांचे अर्ज पूर्वसंमतीसाठी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे ऑनलाईन पद्धतीने प्राप्त होतात. तालुका कृषि अधिकारी यांचेकडून पूर्वसंमती मिळाल्यापासून लाभार्थ्यांने १५ दिवसांच्या आत काम सुरु करुन दोन महिन्यात काम करणे आवश्यक आहे. तद्नंतर प्लास्टिक फिल्म बसविल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी यांचेकडून कामाचे जिओ टॅगिंग केले जाते. अक्षांश व रेखांशासह निरीक्षणे मापनपुस्तिकेत नोंदवून मोका तपासणी अहवाल व फोटो महाडिबीटी पोर्टलवर अपलोड केला जातो. सदर तपासणी अहवालाच्या आधारे तालुका कृषि अधिकारी अनुदान अदायगीची शिफारस जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी यांच्याकडे करतात. त्यानंतर जिल्हास्तरावरुन पी.एफ.एम.एस. प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट अनुदान जमा करण्यात येते.

(४) होय, हे खरे आहे.

(५) याबाबत चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना कृषि आयुक्तालयास देण्यात आल्या आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर याप्रकरणी तपासून उचित कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.